# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १८/०१/२०२५ (शनिवार) सायंकाळ

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द कारवाई
## स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण ची कारवाई

पोलीस स्टेशन खापरखेडा :—दिनांक १८/०१/२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक खापरखेडा हददीत पेट्रलिंग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी बिनासंगम येथे संशयीत ट्रक क्रमांक एम.एच ३१ डब्लयु ७१४६ हे थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. ट्रक चालक आरोपी नामे **मोहन गजानन केळवदे, वय ३४वर्ष, पत्ता. बिनासंगम ता कामठी जि नागपुर** याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. तसेच रेतीची वाहतुक ट्रक क्रमांक एम.एच ३१ डब्लयु ७१४६ चा मालक **निलेश प्रकाश सोनेकर ,वय ३१ वर्ष, पत्ता. बिनासंगम ता कामठी जि नागपुर** यांच्या सांगण्यावरून करीत असल्याबाबत सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन **१)** २ ब्रास रेती किंमती १०००० /— रूपये आणि **२) ट्रक क्रमांक** एम.एच ३१ डब्लयु ७१४६ किंमती ५,००,०००/— रूपये **असा एकुण** ५,१०,००० /—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.

ट्रक चालक आरोपी नामे मोहन गजानन केळवदे, वय ३४वर्ष, पत्ता. बिनासंगम ता कामठी जि नागपुर आणि वाहतुक निलेश प्रकाश सोनेकर ,वय ३१ वर्ष, पत्ता. बिनासंगम ता कामठी जि नागपुर याच्या विरूध्द पोस्टे खापरखेडा येथे कलम ३०३(२),४९ भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम,सह कलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे.



## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द कारवाई
## स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण ची कारवाई

दिनांक १८/०१/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोस्टे उमरेड हददीत पेट्रोलिंग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की पोस्टे उमरेड हद्दीत अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पोलीस ठाणे उमरेड हद्दीत टीप्पर क्र. MH 33 T 3003 हे थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. टिप्पर चालक **आरोपी नामे किशोर घनश्याम नहाले, वय २७ वर्ष रा चिंचोली बुद्रुक ता. ब्रह्मपुरी जि. चंद्रपूर** याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष टिप्पर मधुन १) एक भारत बेंज कंपनीचा १२ चक्का टिप्पर क्र. MH 33 T 3003 की. ६०,००,०००/—रू व ट्रक मधील १० ब्रास रेती किंमती ५०००० रू असा एकूण ६०,५०,०००/— रू चा रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे. जप्त मुद्देमाल व कागदपत्र पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे उमरेड यांचे ताब्यात देण्यात आले. त्याचे विरुद्ध कलम ३०३(२),४९ भा.न्या.सं., सहकलम ४८(७), (८) म.ज.म. अधि. सहकलम ४, २१ खाणी आणि खनिजे अधिनियम, सहकलम ०३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर